ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53
Licenced to post without prepayment

# अर्थ


अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

" अर्थ एव प्रधान: " इति कौटिल्य: अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १९ | पुणें, बुधवार तारीख ६ मे, १९५३ | अंक १८


## सोज्वळ स्वप्न साकार झालें.
## बँक ऑफ महाराष्ट्र लि. पुणें २.




**बँक ऑफ महाराष्ट्र लि. स्वतःच्या वरील टोलेजंग इमारतींतून आपला कारभार चालविणार असून जनतेची सेवा तिचेकडून यापुढें आणखी परिणामकारक होईल.**

प्रारंभीं दहा लाख रु. अधिकृत भांडवलावर चालू झालेल्या या बँकेचें सध्यां भांडवल ५० लाख रु. वर गेलें आहे व कालांतरानें तें एक कोटीपर्यंत जाईल अशी अपेक्षा आहे. आज बँकेची गंगाजळी ६ लक्ष १६ हजारांपर्यंत असून तिचें खेळतें भांडवल ३ कोटी ४० लाखांवर गेलें आहे. यावरून बँकेच्या आर्थिक मजबुतीची व भरभराटीची कल्पना येईल.

संचालक मंडळ

श्री. धों. कृ. साठे (अध्यक्ष) श्री. न. ग. पवार, श्री. फ. दो. पद्मजी, श्री. शं. ल. किर्लोस्कर.
श्री. श्री. गो. मराठे (उपाध्यक्ष) श्री. मा. रा. जोशी, श्री. मा. वी. शहा, श्री. मा. म. गुप्ते.

थोरले बाजीराव रस्ता, पुणें २. } महाराष्ट्राचें मानस्थान बनलेली अग्रगण्य बँक { चिं. वि. जोग मॅनेजर.

**श्री. धों. कृ. साठे** | **कै. प्रो. वा. गो. काळे** | **श्री. चिं. वि. जोग**



इतर कुठल्याहि कार्यापेक्षा बँकेच्या कार्याला त्यांनीं नेहमींच प्राधान्य दिलें आहे. त्यांचे सततोद्योग व कष्ट नसते, तर महाराष्ट्रांत त्यावेळीं जॉइंट स्टॉक बँक निघण्याचें स्वप्न कदाचित् दिवास्वप्न ठरलें असतें.

* * *



आज महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेंत बँकेस मानाचें व महत्त्वाचें स्थान आहे, व आज ती महाराष्ट्रांतील अग्रगण्य बँक गणली जात आहे, त्या सर्वांचें श्रेय प्रो. काळे ह्यांनीं घालून दिलेल्या भरीव पायासच आहे.

* * *




श्री. जोगहि व्यवहारांत चोख, दक्ष व बँकेची वाढ हीच आपल्या महत्त्वाकांक्षेची वाढ अशी वृत्ति ठेवणारे आहेत. त्यांच्या दृढनिश्चयामुळें त्यांच्या दहा वर्षांच्या कारकीर्दींत बँकेची खूपच वाढ झाली आहे.

* * *

## महाराष्ट्र बँकेचें पहिलें संचालक मंडळ

### उद्घाटन-प्रसंग



बसलेले:—(१) मा. रा. जोशी, (२) न. ग. पवार, (३) त्र्यं. वि. रानडे, (४) फ. दो. पदमजी, (५) भा. म. गुप्ते, (६) सर एस. एन. पोचखानवाला (बँकेचे उद्घाटक), (७) वा. गो. काळे, (८) धों. कृ. साठे, (९) र. चिं. सोहोनी, (१०) श्री. गो. मराठे, (११) वा. पुं. वर्दे.

उभे:—(१) मा. वि. गोखले, (मॅनेजर), (२) व्ही. के. खरे (अकौंटंट)

* * * * * * * * *

[प्रो. काळे हे प्रथमपासून १९४३ अखेर चेअरमन होते; त्यांच्या जागीं श्री. साठे (प्रथमपासून व्हाइस चेअरमन) ह्यांची निवडणूक झाली, आणि श्री. वर्दे हे व्हाइस चेअरमन झाले. १९४९ मध्यें श्री. वर्दे ह्यांच्या राजीनाम्यानंतर श्री. मराठे ह्यांची व्हाइस चेअरमन म्हणून निवडणूक झाली. आजचे चेअरमन व व्हाइस चेअरमन श्री. साठे व मराठे हे आहेत.

बँकेचे पहिले मॅनेजर, श्री. गोखले ह्यांनीं १९४३ मध्यें राजीनामा दिल्यानंतर अकौंटंट श्री. हळबे ह्यांनीं कायम मॅनेजरची नेमणूक होईपर्यंत ॲक्टिंग मॅनेजर म्हणून कांहीं काळ काम केलें. श्री. जोग हे तेव्हांपासून मॅनेजर आहेत.]

# अर्थ

बुधवार, ता. ६ मे, १९५३





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## महाराष्ट्र बँकेचा अधिकाधिक उत्कर्ष होवो

" महाराष्ट्राची आर्थिक व सामाजिक परिस्थिति एका विशिष्ट प्रकारच्या चाकोऱ्यांत जाऊन पडल्यानें त्यांत उद्योगधंदे आणि व्यापार ह्यांची अभिवृद्धि प्रागतिक व संघटनात्मक पद्धतीनें झाल्यावांचून जनतेचा निभाव लागावयाचा नाहीं, ही जाणीव सर्वत्र उत्पन्न झाली आहे, ही समाधानाची गोष्ट आहे. महाराष्ट्रीयांची संस्कृति अभिमानास्पद आहे ह्याविषयींची ग्वाही परप्रांतीय लोक देत आले आहेत, ही गोष्ट अभिनंदनीय आहे, व त्याबद्दल येथील जनतेस धन्यता वाटणें सहाजिकच आहे. तथापि, एकांगीपणाचें वैगुण्य त्या संस्कृतीमध्यें उत्पन्न झालें असून तें वेळींच दूर केलें गेलें नाहीं तर महाराष्ट्राची पिछेहाट झाल्यावांचून रहाणार नाहीं हा विचार अनेक विचारवंतांच्या मनास बोचत आहे. संपत्ति उत्पन्न करण्याचीं साधनें हातांत असतील तरच कोणत्याहि समाजास राजकारण, सामाजिक सुधारणा आणि कलांचा परिपोष ह्या गोष्टी साधतील. सांपत्तिक अभिवृद्धीच्या अभावीं कोणत्याहि संस्कृति लटपटीतच रहाणार. धर्म आणि काम हे अर्थमूल आहेत असें चाणक्यानें आपल्या अर्थशास्त्रांत ठासून सांगितलें आहे त्याचें हेंच कारण आहे. समाजाच्या संस्कृतीचा ओघ बदलणें हें काम अर्थातच सोपें नाहीं. तथापि, त्या दिशेनें प्रयत्न होणें आणि त्या प्रयत्नांस जनतेचें सहाय अधिकाधिक लाभणें, ह्या गोष्टी महत्त्वाच्या आहेत." बँक ऑफ महाराष्ट्राच्या स्थापनेकडे लोकांनीं कोणत्या दृष्टीनें पाहिलें पाहिजे, ह्याचें विवरण "अर्था"नें ६ नोव्हेंबर, १९३५ च्या अंकांत वरीलप्रमाणें केलें होतें.

महाराष्ट्रांत बँकांच्या अपयशाची आठवण फार जुनी झाली नव्हती, अशा वेळीं भेकडपणास दूर सारून, महाराष्ट्रीय आर्थिक व्यवहारांस आवश्यक असणाऱ्या नव्या बँकेच्या स्थापनेचा उद्योग आरंभून बँकेच्या उत्पादकांनीं हळुहळु पण निश्चितपणें पुढें पाऊल टाकण्याचें ठरविलें. बँकेच्या उद्‌घाटनप्रसंगीं प्रो. वा. गो. काळे ह्यांनीं जें भाषण केलें, त्यांत उत्पादकांना वाटत असलेली जबाबदारी स्पष्टपणें दिसून येत होती. श्री. वा. पुं. वर्दे, ह्यांचा लेख पृ. १४७ वर प्रसिद्ध केला आहे, त्यांत त्यांनीं संचालकांच्या अत्यंत उचित अशा धोरणाची तपशीलवार माहिती दिली आहे. तीवरून बँकेच्या चालकांनीं आपलें कर्तव्य किती तत्परतेनें पार पाडलेलें आहे, हें दिसून येईल. महाराष्ट्र बँकेच्या मागोमाग इतरहि अनेक बँका निघाल्या, त्यांनीं महाराष्ट्र बँकेच्या परंपरेचें अनुकरण केलें व पूर्वीं ज्या सबंध महाराष्ट्रांत महाराष्ट्रीय बँकेची एकाद-दुसरी कचेरी होती, त्याच महाराष्ट्रांत आतां शेकडों कचेऱ्या आढळतील. बँक ऑफ महाराष्ट्रानें महाराष्ट्रीय जनतेला त्याच्या कर्तृत्वाची जाणीव करून दिली व तिच्या स्वतःवरील विश्वास वृद्धिंगत केला. बँक ऑफ महाराष्ट्राचे उत्पादक ध्येयबुद्धीनें प्रेरित झालेले होते व ही संस्था आदर्श व अनुकरणीय करून दाखविण्याचा त्यांचा संकल्प होता. त्या बँकेनें केलेली प्रगति पहातां, उत्पादकांचा हेतु सिद्धीस गेला, असेंच कोणीहि म्हणेल. त्यांच्या मूळ अपेक्षेपेक्षा बँकेचें कार्यक्षेत्र वाढलें आहे आणि जनतेनें उत्पादकांच्या परिश्रमाचें चीज केलें आहे. बँकेच्या नव्या इमारतीच्या उद्‌घाटनाचे निमित्तानें आम्हीं बँकेला अधिकाधिक उत्कर्ष चिंतितों. बँकेचा उत्कर्ष म्हणजेच महाराष्ट्रीय व्यापार-उद्योगाचा उत्कर्ष होय.

---

## बँक ऑफ महाराष्ट्र लि.ची सालोसाल प्रगति

१६ सप्टेंबर, १९३५—बँकेची स्थापना.

१९३७—बँकेचे दुसरे वर्षीच द. सा. द. शें. ३½ टक्के प्रमाणें करमाफ डिव्हिडंड वाटण्यांत आलें.

१९३८—प्राथमिक स्वरूपी सर्व खर्च लिहून टाकण्यांत येऊन मुंबई येथें पहिली शाखा उघडण्यांत आली.

१९४०—डेक्कन जिमखाना येथें स्थानिक शाखा उघडली.

१९४२—बँकेचे प्रथमपासून असलेले मॅनेजर श्री. एम. व्ही. गोखले सेवानिवृत्त झाले.

१९४३—जळगांव (पूर्व खानदेश) व नागपूर येथें दोन नवीन शाखा काढण्यांत आल्या. बँकेनें स्वत.चे इमारतीसाठी विश्रामबाग वाड्यासमोर १ लक्ष, ५ हजार रुपयांस जागा खरेदी केली. श्री. चिं. वि. जोग ह्यांची मॅनेजर म्हणून नेमणूक.

१९४४—बँकेनें ५ रु. वाढाव्यानें काढलेले सर्व शेअर्स खपले जाऊन वाढाव्याची सर्व रक्कम (१,३२,९९५ रु.) गंगाजळींत टाकण्यांत आली. बँकेनें शेड्यूल्ड होण्याचा मान पटकावला. गिरगांव (मुंबई) व खडकी येथें दोन नवीन शाखा उघडल्या.

१९४५—रत्नागिरी व कोपरगांव येथें शाखा व फैजपूर (पूर्व खानदेश) येथें पे ऑफिस उघडण्यांत आलीं. बँकेनें एक्झिक्यूटर व ट्रस्टीचें काम करण्याकरितां स्वतःची सबसिडिअरी कंपनी काढण्याचें ठरविलें.

१९४६—धुळें, सोलापूर, चाळिसगांव, नाशिक, हुबळी, कल्याण व इतवारी (नागपूर) येथें नवीन शाखा उघडण्यांत आल्या. प्रो. काळे ह्यांचा मृत्यु.

१९४७—बँकेनें ५ रु. वाढाव्यानें काढलेले सर्व शेअर्स खपून वाढाव्याची सर्व रक्कम (७०,००० रु.) गंगाजळींत टाकण्यांत आली. दादर येथें शाखा उघडली.

१९४८—श्री. वा. पुं. वर्दे, ह्यांची रिझर्व्ह बँकेच्या मुंबई लोकल बोर्डावर नेमणूक झाली म्हणून त्यांस बँकेच्या बोर्डाचें सभासदत्व सोडावें लागलें.

१९४९—कोल्हापूर, हैद्राबाद येथें दोन शाखा व सोलापूर येथें एक उपशाखा उघडण्यांत आली.

१९५१—सांगली व अमरावती येथें दोन शाखा उघडण्यांत आल्या. मॅनेजर श्री. चिं. वि. जोग, ह्यांना बँकिंगच्या उच्च शिक्षणासाठीं युनायटेड किंग्डम-युरोपला पाठविलें. इन्स्टिट्यूट ऑफ बँकर्स, लंडन, ह्या संस्थेचे ते फेलो निवडले गेले.

१९५२—ठाणें व हरिहर येथें दोन शाखा उघडल्या.

१९५३—मुख्य कचेरीच्या इमारतीचा उद्‌घाटन समारंभ.

## महाराष्ट्र बँकेच्या स्थापनेचा इतिहास

( बँकेच्या प्रकाशनावरून )

१९२० ते ३० या कालखंडांत महाराष्ट्रांतील अनेक बँका बुडाल्यानें तिथल्या लोकांचा 'बँक' या संस्थेवरील विश्वास उडाला. यावर उपाय म्हणून सहकारी बँकांची आवश्यकता सूचित करण्यांत येऊं लागली व सहकारी बँकांची वाढहि जोरांत होऊं लागली. पण सहकारी बँकांचें क्षेत्र मर्यादित पडल्यानें व्यापार, उदीम व उद्योगधंदे यांना लागणारी आर्थिक मदत त्यांच्याकडून संपूर्णतया मिळणें अशक्य होतें. या कारणामुळें महाराष्ट्रांत परत एखाद्या जॉइंट स्टॉक बँकेची आवश्यकता तीव्रतेनें भासूं लागली. मोठ्या बँकांचें लहान व्यापार-धंद्यांकडे विशेष लक्ष नव्हतें. त्यामुळें सहकारी बँकिंगच्या क्षेत्रांत नाणावलेल्या अशा कै. वा. गो. काळे, श्री. धों. कृ. साठे, श्री. वा. पुं. वर्दे व श्री. भा. म. गुप्ते यांच्या सारख्या व्यक्तींनीं या प्रश्नांत अधिक लक्ष घालण्यास सुरवात केली. १९३४ सालीं पुण्यास जी व्यापारी परिषद् भरली होती तिथें या व्यक्तींच्या सूचनांना पाठिंबा मिळाला. मराठा चेंबर ऑफ कॉमर्स या संस्थेनें व तिच्या सदस्यांनींहि या कल्पनेस आपल्या परीनें हातभार लावला व १९३५ च्या सप्टेंबर महिन्यांत बँक मूर्त स्वरूपांत अवतरली.

### पहिलें संचालक मंडळ

बँकेच्या पहिल्या संचालक मंडळाचे सदस्य कै. प्रा. वा. गो. काळे, श्री. धों. कृ. साठे, श्री. न. ग. पवार, श्री. वा. पुं. वर्दे, श्री. त्र्यं. वि. रानडे, श्री. र. चिं. सोहोनी, श्री. श्री. गो. मराठे, श्री. मा. रा. जोशी व श्री. भा. म. गुप्ते हे होते. श्री. फ. दो. पदमजी यांस १९३६ सालीं संचालक मंडळावर घेण्यांत आलें.

### सध्यांचें संचालक मंडळ

सध्याचे संचालक मंडळाचे सभासद, श्री. धों. कृ. साठे, अध्यक्ष, (२) श्री. श्री. गो. मराठे उपाध्यक्ष, (३) श्री. न. ग. पवार, (४) श्री. मा. रा. जोशी, (५) श्री. मा. वी. शहा, (६) श्री. भा. म. गुप्ते, (७) श्री. फ. दो. पदमजी व (८) श्री. शं. ल. किर्लोस्कर हे आहेत.

### यशाचें रहस्य

अत्यंत लहान प्रमाणावर सुरवात करून बँकेनें सध्यां दिसत असलेला विकासाचा पल्ला गांठला आहे. याच्या मुळाशीं बँकेनें किंचित् सनातनी अशा वाटणाऱ्या पद्धतीचा व सुसूत्र व नियमबद्ध बँकिंगच्या तत्त्वाचा पुरस्कार केला हींच कारणें आहेत. यामुळें आज महाराष्ट्राच्या अर्थ-व्यवस्थेंत तिला मानाचें व महत्त्वाचें स्थान प्राप्त झालें आहे व आज ती महाराष्ट्रांतील अग्रगण्य बँक गणली जात आहे. या सर्वांचें श्रेय कै. प्रो. वा. गो. काळे यांनीं घालून दिलेल्या भरीव पायासच आहे. त्यांच्या कुशल मार्गदर्शनाखालींच बँकेचें ध्येय व धोरण निश्चित झालें व आज त्यांच्या पाठीमागेंहि संचालक मंडळ बहुतांशीं तेंच धोरण पुढें चालवीत आहे.

सध्यांचे अध्यक्ष श्री. धों. कृ. साठे यांनीं देखील बँकेच्या स्थापनेपासून तिच्या प्रगतीसाठीं अविरत श्रम घेतले आहेत. इतर कुठल्याहि कार्यापेक्षा बँकेच्या कार्याला त्यांनीं नेहमींच प्राधान्य दिलें आहे व त्यांचे सततोद्योग व कष्ट जर नसते तर महाराष्ट्रांत त्यावेळीं जॉइंट स्टॉक बँक निघण्याचें स्वप्न कदाचित् दिवास्वप्न ठरलें असतें.

श्री. वामनराव वर्दे यांनींहि बँकेच्या यशाला चांगलाच हातभार लावला आहे. बँकेच्या क्षेत्रांत श्री. वामनराव वर्दे हे एक नाणावलेले तज्ज्ञ समजले जातात. उद्योगधंद्याच्या क्षेत्रांतहि त्यांचें स्थान फार मोठें आहे. रिझर्व्ह बँकेच्या संचालक मंडळाप्रमाणेंच आतां त्यांची इंडस्ट्रिअल फायनान्स कार्पोरेशन ऑफ इंडियाच्या संचालक मंडळावरहि निवड झाली आहे. आपल्या संचालकांपैकी एकाला हा मान मिळाला हें बँकेस खासच भूषणावह आहे. आज जरी ते संचालक मंडळांत नसले तरी त्यांच्या अनुभवाचा व ज्ञानाचा लाभ अजूनहि आवश्यक तेव्हां मिळतो.

इतर संचालकांनीं देखील आपापल्या परीनें हातभार लावून बँकेचें यश वृद्धिंगत करण्यास अमोल मदत केली आहे. संचालक मंडळाचें सर्व काम सहकार्यानें चालतें व त्याचे सर्व निर्णय एकमतानें घेतले जातात, हेंच बहुधा बँकेच्या यशाचें गमक आहे.

### बँकेचा आधार: मध्यमवर्गीय लोक

बँकेचे बहुसंख्य ठेवीदार व भागीदार मध्यमवर्गीय असून त्यांच्याच आधारें ही बँक चालली आहे. या वर्गानें आपला शिल्लक असलेला पैसा या बँकेंत या, ना त्या प्रकारें ठेऊन एक मोठी शक्ति निर्माण होण्यास हातभार लावला आहे. या बँकेंत कुठलीहि व्यक्ती, जमात अगर भांडवलदार यांचे विशिष्ट संबंध गुंतलेले नाहींत.

### डिव्हिडंड

अगदी पहिल्या भागीदारांना बँकेनें २५ रुपयांचे वसूल भांडवलावर व्याज रूपानें १८ रु. २ आणे परत केले आहेत व इतकें असूनहि गंगाजळी भरीव करण्यांत कसूर केलेली नाहीं.

### शाखांबाबतचें धोरण

ग्रामीण विभाग व मध्यम शहरें यांतील लोकांना बँकिंगचा जास्त फायदा घेतां यावा यांच दृष्टीनें शाखा उघडल्या जातात. बँकेच्या २२ शाखांपैकी १७ शाखा मुंबई राज्यांत असून बाकीच्या पांच शाखा नागपूर, अमरावती, हैद्राबाद, हुबळी, हरिहर, वगैरे ठिकाणीं जेथें महाराष्ट्रीयांचे आर्थिक हितसंबंध आहेत अशा ठिकाणीं आहेत. पैकी सोलापूर (मुख्य शाखा) व डेकन जिमखाना येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्टचीहि व्यवस्था करण्यांत आली आहे.

### व्यवस्थापक, अधिकारी व नोकरवर्ग

बँकेच्या नोकरवर्गाचाहि या प्रगतींत बराच मोठा भाग आहे. बँकेचा अधिकारी वर्ग क्वॉलिफाईड, अनुभवी व कार्यक्षम असून नोकरवर्गहि प्रामाणिक व आस्थेवाईक आहे. व्यवस्थापकांचे व नोकरवर्गाचे संबंध अत्यंत आपलेपणाचे आहेत. बँकेनें नोकरवर्गाला शक्य असेल तेवढा पगार देण्याची कोशीस केली असून, बँकेनें वेळोवेळीं ठरविलेल्या श्रेणी या दरवेळीं जाहीर झालेल्या लवाद निवाड्याच्या जवळपास होत्या.

बँकेनें १९५१ सालीं श्री. चिं. वि. जोग, व्यवस्थापक, यांना आधुनिक पाश्चात्य बँकिंग पद्धतीचा अभ्यास व निरीक्षण करण्यासाठीं इंग्लंडला पाठविलें होतें. त्यांची या दौऱ्यांत लंडनच्या इन्स्टिट्यूट ऑफ बँकर्सचे फेलो म्हणून निवड झाली. या दौऱ्यांत त्यांना मिळालेल्या अनुभवाचा व ज्ञानाचा बँकेस फायदा मिळत आहे. नुकतीच त्यांची इंडियन बँक्स असोसिएशनच्या कार्यकारिणीवर निवडणूक झाली आहे.

### पोटकंपनी

१९४६ सालीं बँकेनें महाराष्ट्र एक्झिक्यूटर व ट्रस्टी कं. या नांवाची एक पोटकंपनी स्थापन केली असून ती माफक दरांत विश्वासपत्रांच्या व मृत्युपत्रांच्या व्यवस्थेचें काम करते. तिची प्रगति होत असून या सध्यांच्या दिवसांत आवश्यक असलेल्या अशा या संस्थेचा लोक अधिकाधिक फायदा घेतील अशी आशा आहे.

# मराठी प्रदेशांतील शिलकी पैशाचा महाराष्ट्राच्या आर्थिक प्रगतीस उपयोग

## उत्पादकांच्या मनोगताचें प्रो. काळे ह्यांनीं केलेलें स्पष्टीकरण

"आमच्या देशांतील पतीचे व्यवहार करणाऱ्या संस्थां-संबंधींच्या उणीवा दूर करून बदलत्या आर्थिक परिस्थितीच्या गरजा भागविण्यास पुरी पडेल अशी बँकिंगच्या संस्थांची जोपासना करण्याची आवश्यकता कोठें जर विशेष असेल, तर ती महाराष्ट्रांतच आहे. पतीच्या व्यवहारांत एकसूत्रीपणा आणण्याकरितां जें कार्य होणें आवश्यक आहे, तें घडवून आणण्यास सहाय्य करण्याचा बँक ऑफ महाराष्ट्राच्या उत्पादकांचा मनोदय आहे. मराठी प्रदेशांतील लोकांजवळील शिलकी पैशाचा उपयोग याच भागांतील व्यापारउदिमाच्या वाढीकरितां व येथील लोकांची आर्थिक परिस्थिति सुधारण्याकरितां करण्याच्या उद्देशानें या बँकेचें संवर्धन करण्याची त्यांची मनीषा आहे.

"बँकिंगच्या व्यवसायाचे बाबतींत मागें पडलेल्या महाराष्ट्रांत बँकिंगच्या सोयींची वाढ होण्याची व त्यांतील पडून राहिलेली आर्थिक साधन-संपत्ति नीट उपयोगांत येण्याची तीव्रतर जरूरी भासत आहे. मराठी जिल्ह्यांत महाराष्ट्रीय अशी एकहि मोठी बँक आज अस्तित्वांत नाहीं आणि असल्या संस्थेची जागा मुंबईच्या बँकांच्या शाखांनीं भरून निघणें अशक्य आहे. स्थैर्य व सुरक्षितता यांवर बँकिंग-व्यवसायाचें यश अवलंबून असतें. बँका काढण्याच्या बाबतींतील उत्साहातिरेकामुळें या दोन मूलभूत गोष्टींकडे दुर्लक्ष केलें जाण्याचा जसा संभव आहे, त्याप्रमाणें पूर्वी बँकांच्या बाबतींत आलेल्या अपयशाच्या आठवणीमुळें पुन: बँकिंगच्या व्यवसायाकडे फिरकूं नये असा भेकडपणा व बेफिकिरी उत्पन्न होण्यांतहि धोका आहे. बँक ऑफ महाराष्ट्राच्या संस्थापकांना चालू परिस्थितींतील अनुकूलता व मर्यादा या दोघांचीहि जाणीव असून त्यांनीं हळूहळू परंतु निश्चितपणें पुढें पाऊल टाकण्याचें ठरविलें आहे. परिस्थितीची शक्यता व लोकांच्या गरजा विचारांत घेऊन आम्हीं आमचा व्याप वाढवूं व जरूरीप्रमाणें महाराष्ट्रांत व महाराष्ट्राबाहेरहि शाखा उघडून वा अन्य तऱ्हेनें आम्हीं आमचें संबंध जोडू. व्यापारी वर्गाच्या सहकार्यानें व जनतेच्या सक्रिय सहानुभूतीनें लवकरच इच्छित यश संपादन करण्याची आम्हांस उमेद वाटत आहे":—बँक ऑफ महाराष्ट्र लि. चे चेअरमन, प्रो. वा. गो. काळे, ह्यांचें ता. ८ फेब्रुवारी १९३६ रोजीं झालेल्या बँकेच्या उद्घाटन समारंभांतील भाषण.

### श्री. वर्दे ह्यांना विनंति



ह्या अंकांत दुसरीकडे "महाराष्ट्र बँकेच्या यशाचें रहस्य" श्री. वर्दे ह्यांनीं मार्मिकपणें सांगितलें आहे. महाराष्ट्र बँकेच्या यशास सर्वच संचालकांनीं हातभार लावला आहे. त्यांपैकीं प्रो. काळे, श्री. साठे व श्री. वर्दे ह्यांच्या कार्याचा विशेष उल्लेख केला तर तें योग्यच होईल. बँकेच्या वाढलेल्या कार्यक्षेत्रामुळें तिच्या चालकांवरील जबाबदाऱ्याहि वाढल्या आहेत. अशा वेळीं श्री. वर्दे ह्यांनीं बँकेच्या मार्गदर्शनासाठी पुन: परत यावें अशी आमची त्यांना आग्रहाची विनंति आहे श्री. वर्दे ह्यांच्या नेतृत्वाचें महत्त्व वाटणाऱ्या, महाराष्ट्र बँकेपेक्षा मोठ्या आर्थिक संस्था आहेत व त्या सोडून येण्याचा त्यांना आम्हीं आग्रह करीत आहोंत. कारण, महाराष्ट्र बँकेच्या व महाराष्ट्राच्या आर्थिक प्रगतीबद्दल त्यांना अत्यंत जिव्हाळा वाटतो. म्हणूनच ते हा त्याग करतील आणि त्याचा फायदा एकट्या महाराष्ट्र बँकेसच नव्हे तर तिच्या द्वारा सर्वच महाराष्ट्रीय आर्थिक उपक्रमांत मिळेल, अशी आम्हांस आशा आहे.

### महाराष्ट्र बँकेच्या प्रगतीचे बोलके आकडे

| ताळेबंदाचें वर्ष | जमा शेअर भांडवल | रिझर्व्ह फंड | ठेवी | खेळतें भांडवल | एकूण उत्पन्न | निव्वळ नफा | एकूण डिव्हिडंडची रक्कम | डिव्हिडंडचा दर (% करमाफ) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | (रु.) | (रु.) | (रु.) | (रु.) | (रु.) | (रु.) | (रु.) | (रु.) |
| १९३६ | १,०४,००० | १३० | ७,२०,००० | ९,२६,३०० | ११,७०० | ६०० | ... | ... |
| १९३७ | १,१२,००० | ७,०१५ | १२,१२,००० | १३,३९,००० | २८,६०० | १३,७०० | ३,७०० | ३½ |
| १९३८ | १,२५,००० | १६,००० | १७,०४,००० | १८,५५,००० | ३५ ४०० | १७,५०० | ४,१०० | ३½ |
| १९३९ | १,५१,००० | २९,००० | २०,८३,००० | २१,२३,००० | ४२,१०० | १९,२०० | ४,९०० | ३½ |
| १९४० | १,८१,००० | ४१,१०० | २७,५२,००० | ३०,३९,००० | ५० ६०० | २१,३०० | ६,५०० | ४ |
| १९४१ | २,०९,००० | ५०,२०० | ३३,६२,००० | ३७ ३१,००० | ६१,८०० | २०,४०० | ७,७०० | ४ |
| १९४२ | २,९०,००० | ५०,२०० | ४४,४६,००० | ४८,४३,००० | ७७,००० | २८,००० | १०,२०० | ४½ |
| १९४३ | ३,४०,००० | ६१,००० | ६६,९१,००० | ७३,००,०१० | ९६,००० | ३६,००० | १४,९०० | ४½ |
| १९४४ | ७,५७,००० | २,०८,००० | ९२,२३,००० | १,०७,६१,००० | १,८५,७०० | ८६,७०० | २३,६०० | ४½ व ½ बोनस |
| १९४५ | १२,५० ००० | २,७०,००० | १,२९,७५,००० | १,५५,९०,००० | ३०४,००० | १,७०,००० | ५१,४०० | ५ |
| १९४६ | १२,५०,००० | ३,००,००० | १,८१,७६ ००० | २,०७,३०,००० | ३,९५,००० | १,९२,६०० | ६२,५०० | ५ |
| १९४७ | १६,००,००० | ३,४०,००० | १,८३,३५,५०६ | २,१४,८७,१६३ | ४,९०,०४९ | १,९९,२१७ | ७१,२५० | ५ |
| १९४८ | १६,००,००० | ३,६०,००० | १,८८,४५,१०३ | २,१८,४४,२४६ | ५,१३,२७४ | २,०५,२०९ | ८०,००० | ५ |
| १९४९ | १६,००,००० | ३,८०,००० | २,०८,८३,२२४ | २,४३ ७३,२७४ | ८,४८,२०३ | २,०४ ६४५ | ८०,००० | ५ |
| १९५० | १६,००,००० | ४,२१,००० | २,३०,७३,६११ | २,७२,४६,४३५ | ९,८७,६१० | २,२९,६०१ | ८०,००० | ५ |
| १९५१ | १६,००,००० | ५,१७,००० | २.६०,३०,६८६ | ३,१२,१८,४६९ | ११,२८,३२२ | २,३९,६५० | ८०,००० | ५ |
| १९५२ | १६,००,००० | ५,६५,००० | २,८१,६२,६११ | ३,२५,१०,४६४ | १२,२५,४१३ | २,५४,५२० | ८०,००० | ५ |

# महाराष्ट्र बँकेच्या प्रगतीचा आढावा

## बँकेच्या इमारतीच्या उद्घाटनप्रसंगीं चेअरमन, श्री. धों. कृ. साठे, ह्यांचें भाषण

" १९२५ सालानंतर महाराष्ट्रांत मोठी अशी आर्थिक संस्था नसल्यानें लहान लहान उद्योगधंदे व व्यापार यांना अडीअडचणींचे वेळीं मदत मिळणें दुरापास्त झालें होतें व त्यादृष्टीनें महाराष्ट्राच्या सेवेस आपलाहि कांहीं हातभार लावावा अशा उच्च उद्देशानें बँकेच्या संस्थापकांनीं ही बँक काढली. फक्त ठेवी गोळा करून वैयक्तिक लाभासाठी त्याचा उपयोग करणें हें ध्येय येथें मुळींच नव्हतें. आरंभापासूनच ही बँक सर्व महाराष्ट्रीयांची आहे; कोणाहि एका व्यक्ति वा गटाची नाहीं हा दृष्टिकोन ठेवल्यामुळें संचालकांनीं कुठल्याहि दृष्टीनें त्यांत अधिकारपद स्वीकारलें नाहीं किंवा आपले हितसंबंधीयांनाहि अधिकाराच्या जागेवर नेमलेलें नाहीं.

### संचालकांतील एकोपा व ध्येयनिष्ठा

" पहिल्याच संचालक मंडळांत आम्हांला अखिल भारतीय कीर्तीचे अर्थशास्त्रज्ञ कै. प्रो. वा. गो. काळे हे अध्यक्ष म्हणून लाभले. बँकिंगच्या शास्त्रशुद्ध तत्त्वावर त्यांच्या मार्गदर्शनाखालीं तेव्हां ध्येय व धोरण ठरविण्यांत आलें व तर्कशुद्ध व्यवहाराचा सर्वांनीं मिळून पाया घातला व त्याच तत्त्वांचें आजहि आम्हीं परिशीलन करीत असल्यानेंच बँकेची भरभराट इतक्या लौकर होऊं शकली आहे. प्रारंभापासूनचे व्हाइस चेअरमन श्री. वा. पुं. वर्दे यांना त्यांची रिझर्व बँकेच्या स्थानिक सल्लागार मंडळावर निवड झाल्यानें निवृत्त व्हावें लागलें. सर्व संचालकांनीं बँकेचें काम हें आपलेंच काम आहे असें समजून काम केलें, व त्यामुळें आमचा कारभार प्रारंभापासून आज १७ वर्षें एकोप्यानें व एकदिलानें चालला आहे. श्री. वामनराव वर्दे यांची रिझर्व बँक व इंडस्ट्रियल फायनान्स कार्पोरेशन यांचे संचालक मंडळावर निवड झाली हें बँकेला भूषणावह असेंच आहे. इतक्या कार्यमानतेंतहि त्यांच्या प्रदीर्घ व्यासंगाचा व गाढ अनुभवाचा लाभ आम्हांस केव्हांहि हक्कानें मिळूं शकतो. बँकेच्या कारभारांत संचालक मंडळापैकी कुणाचेहि वैयक्तिक हितसंबंध गुंतलेले नाहींत.

### व्यवस्थापकांची पोषक वृत्ति

" आमच्या या वृत्तीशीं पोषक असेच व्यवस्थापकहि आम्हांस लाभले होते व आहेत. पहिले व्यवस्थापक श्री. मा. वि. गोखले हे ७ वर्षें त्या पदावर होते व त्यांनीं आपला कारभार चोख केला. पुढें त्यांचे महत्त्वाकांक्षेस बँकेचें क्षेत्र अपुरें वाटून त्यांनीं तें पद सोडलें.

" नंतर श्री. जोग आले तेहि व्यवहारांत चोख, दक्ष व बँकेची वाढ हीच आपल्या महत्त्वाकांक्षेची वाढ अशी वृत्ति ठेवणारे आहेत. इथें येण्यापूर्वी ते भारतांतील प्रमुख अशा दोन बँकांत नोकरीस होते. पण आमच्याप्रमाणेंच महाराष्ट्राच्या सेवेंत आपलाहि कांहीं हातभार असावा या हेतूनें ते आमच्यांत आले. इतर लोक प्रगतीसाठी लहान संस्थांतून मोठ्या संस्थांत जाण्याची धडपड करतात पण तत्त्वासाठी मोठ्या संस्थेंतून लहान संस्थेंत येणें व तिची वाढ करण्याचा प्रयत्न करणें या त्यांच्या दृढनिश्चयामुळें त्यांच्या दहा वर्षांच्या कारकीर्दीत बँकेची खूपच वाढ झाली आहे, व तिनें लोकांचा दृढविश्वास संपादन केला आहे.

### एक्सचेंजचा धंदा करण्याची मनीषा

" या प्रगतींत पुढचें पाऊल म्हणून आम्हीं परदेशांशीं एक्स्चेंज किंवा हुंडणावळीचा व्यवहार करण्याची परवानगी मागितली होती. सध्यां पुरेशा असणाऱ्या बँकांत भर न टाकण्याच्या रिझर्व बँकेच्या तत्त्वामुळें पूर्वी ती जरी नाकारली गेली तरी आम्हीं हा व्यवहार अधिक वाढवून ती परत मिळवूं, अशी आम्हांला उमेद आहे. ह्या परदेशी बँकांशीं व्यवहार करण्याबाबत मी असें अभिमानानें सांगूं शकतों कीं ज्या परदेशी म्हणजे इंग्लंडमधील मिडलंड बँकेशीं आम्हीं व्यवहारसंबंध जोडूं बघत होतों त्याच बँकेनें १९५१ सालीं आमचे मॅनेजर श्री. चिं. वि. जोग यांना इंग्लंड व युरोपमधील बँकिंगचें निरीक्षण व अभ्यास करण्यासाठी पाठवलें असतां सर्व प्रकारें सोयी व सवलती दिल्या व आमचे हितसंबंध वाढविण्याची संधि दिली.

### महानगरपालिका व इतर संस्था ह्यांचेशीं संबंध

" पुण्याला १९५० सालीं महानगरपालिका झाल्यावर त्यांनीं जें प्रथम ३० लाखांचें कर्ज उभारलें होतें त्यांतील निम्में आमचे बँकेनें अंडररायट केलें होतें व पुढेंहि काढलेल्या वेळोवेळींच्या कर्जांत साहाय करून आपला वाटा उचलला आहे. कॉर्पोरेशननें गेल्या तीन वर्षांत जी सुमारें एक कोटी पंधरा लाखांचीं कर्जें काढलीं त्यांचीं व्याजें देणें व व्यवस्था ठेवण्याचें त्यांनीं आमचेवरच सोंपविलें आहे, व तें आम्हीं चोखपणें पार पाडीत आहोंत. जें काम फक्त पब्लिक डेटऑफिस व इंपीरिअल बँक ऑफ इंडिया यांचेकडेच असतें असें काम करणाऱ्या क्षेत्रांतहि आम्हांला वाव मिळाला आहे यावरून आमच्या कामाची आपणांस कल्पना येऊं शकेल.

### विनंति आणि आश्वासन

" या प्रसंगीं मी पुण्यांतील इतर अनेक नामवंत व लहानमोठ्या संस्था, ज्यांच्याशीं अजून आमचे संबंध जडलेले नाहींत, अशांनींहि आपल्या व्यवहाराचा अंशभाग तरी आमचेकडे ठेवून व्यवहारास आतां सुरवात करावी व हा विश्वास वृद्धिंगत करावा अशी आग्रहाची विनंती करतों. त्यांचीं खातीं आमचेकडे असल्यास आम्हांला जसा त्यांचा उपयोग होईल तसेंच अडीअडचणीच्या प्रसंगीं आम्हीं आमच्या विशिष्ट मर्यादेपर्यन्त त्यांना उपयोगी पडण्याचा प्रयत्न करूं शकूं. मला सांगण्यास येथें अभिमान वाटत आहे, कीं आज पुण्यांत चालू असलेल्या नामवंत संस्था व उद्योगधंदे व कारखाने यांना योग्य वेळीं आम्हीं वेळोवेळीं मदत करून वेळ निभावण्यास व वर येण्यास मदतच केली आहे. इतर लोकांनींहि आपला पैसा या ना त्याप्रकारें बँकेंत ठेवून आम्हांस नडलेल्या पण गुणी लोकांना व्यापार—वाढीसाठी मदत करण्यास मदत करावी. कारण, चार लोकांनीं ठेवी ठेवल्याखेरीज कांहीं दोन लोकांना कर्जें देतां येणें शक्य नाहीं. या ठेवींचा पैसा वैयक्तिक हितसंबंधासाठी कधींहि वापरला न जातां महाराष्ट्राच्या प्रगतीसाठीच वापरला जाईल अशी मी त्यांना हमी देतों. या प्रसंगीं दुसरी एक अभिमानाची गोष्ट नमूद करण्यासारखी म्हणजे आमच्या खातेदारांपैकी बहुसंख्य खातेदार मध्यमवर्गीय असून त्यांनीं आपली शिल्लक बचतखातीं व इतरद्वारें संपूर्णपणें आमच्याकडे ठेवून आम्हांला अत्यंत मदत केली आहे: सुमारें २ कोटी ८२ लाखाच्या ठेवींपैकी आज अशी सेव्हिंगचीच ठेव रक्कम सुमारें १ कोटी, २२ लाख इतकी आहे."

# महाराष्ट्र बँकेच्या यशाचें रहस्य

## पूर्वेतिहास : ध्येयनिष्ठेचें धोरण व व्यवस्था : प्रो. काळे ह्यांचें मार्गदर्शन

लेखक:–श्री. वा. पुं. वर्दे, बी. कॉम., एफ. आय. बी. (लंडन)

बी. कॉम. च्या परीक्षेसाठी मी बँकिंग हा ऐच्छिक विषय घेतला होता, त्या वेळींच भारतांत, विशेषतः महाराष्ट्रांत, बँकिंगच्या सोई अत्यल्प असल्याचें मला आढळून आलें. बँकिंगच्या सोईची योग्य ती वाढ झालेली नसल्यांनें, व्यापार-उद्दीम व कारखानदारी ह्यांची फारच कुचंबणा होत होती. माझ्या कॉलेजच्या विद्यार्थी-दशेंत आणि पदवी मिळविल्यानंतर मी प्रत्यक्ष अनुभवाच्या शिक्षणासाठी लहान व मोठ्या बँकांत प्रत्यक्ष काम केलें. त्या वेळीं मला असें स्पष्ट दिसलें, कीं मोठे व्यापारी व कारखानदार ह्यांना बँकांकडून कर्जे मिळूं शकलीं तरी लहान व मध्यम प्रमाणांत व्यवहार करणारांना बँकांकडून कसल्याहि प्रकारची मदत मिळणें जवळ जवळ अशक्य होतें. महाराष्ट्रांत, किंवा सबंध मुंबई राज्यांतच म्हणाना, इंपीरिअल बँक किंवा बँक ऑफ इंडिया ह्यांच्या कांहीं थोड्या शाखा होत्या. व्यापारी बँका ज्या प्रकारची आर्थिक मदत देतात तशी मदत जिल्हा व अर्बन सहकारी बँका देऊं शकत नाहींत. नव्यानेंच निघालेल्या टाटा इंडस्ट्रिअल बँकेंत, युनियन बँक ऑफ इंडियांत आणि मुंबई प्रांतिक सहकारी बँकेंत वेगवेगळ्या जागांवर मी काम केलें असल्यामुळें, मी महाराष्ट्राकरितां बँकिंगची संस्था स्थापण्याचें योजिलें व १९२६ सालीं महाराष्ट्र बँकिंग कॉर्पोरेशन ह्या नांवानें एक कंपनी नोंदविली. त्या वेळच्या मंदीमुळें ह्या कंपनीस पुरेसा पाठिंबा मिळाला नाहीं. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सची १९२७ मध्यें स्थापना झाल्यावर, चेंबरच्या दुसऱ्या तिमाही सभेंत बँकेची कल्पना मी मांडली; परंतु तिचेकडे कोणीं विशेष लक्ष दिलें नाहीं. त्या सभेंतील चर्चेची फलप्राप्ति म्हटली, तर गिरगांवांतील डेक्कन मर्चंटस को. क्रे. सोसायटीचें पुनरुज्जीवन होऊन तिचें १९२९ मध्यें दि डेक्कन मर्चंटस को. बँक लि. मध्यें रूपांतर झालें.

ह्या सर्व काळांत, महाराष्ट्राकरितां सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार करणाऱ्या बँकेची गरज अधिकच तीव्र होत चालली. पुणें येथें मराठा चेंबरची स्थापना झाली, तेव्हां श्री. आ. रा. भट ह्यांच्याशीं बँकेच्या माझ्या योजनेची मी चर्चा केली. व्यापार–उद्योगाच्या वाढीस बँकिंगच्या सोईचा अभाव ही महाराष्ट्रांत फारच मोठी अडचण आहे, असें माझ्याप्रमाणें त्यांचेंहि मत पडलें. त्यानंतर चेंबरचे अध्यक्ष व उपाध्यक्ष, प्रोफेसर वा. गो. काळे व श्री. धोंडूमामा साठे, ह्यांचेबरोबर योजनेची चर्चा केली आणि तीमध्यें असें ठरलें, कीं अशा बँकेच्या स्थापनेसाठी तात्काळ प्रत्यक्ष पाऊल पुढें टाकण्यांत यावें. मेमोरँडम व आर्टिकल्स ऑफ असोसिएशन तयार करण्याचें काम सेक्रेटरींच्याकडे सोपविण्यांत आलें. ऑगस्ट, १९३४ मध्यें केसरीचा महाराष्ट्र विशेषांक प्रसिद्ध व्हावयाचा होता, त्यांत लेख लिहून बँकेची कल्पना जनतेपुढें मांडण्याचें काम माझेकडे होतें. बँक नोंदली जाण्यापूर्वीचा तिचा इतिहास थोडक्यांत असा आहे. प्राथमिक कार्य पुरें होण्यास थोडा वेळ लागला. कारण, महाराष्ट्रांतील वेगवेगळ्या जिल्ह्यांचें प्रातिनिधिक संचालक मंडळ बनविण्यांचा उत्पादकांचा प्रयत्न होता. सर्व संचालक पुण्यांतीलच आहेत, अशी तक्रार कांहींजण करतात. परंतु, संचालक मंडळांत महाराष्ट्रांतील वेगवेगळ्या भागांतील प्रमुख गृहस्थांना घेण्याचे प्रयत्न करूनहि ते फसले, हें त्या तक्रारीस उत्तर आहे. अखेर १६, सप्टेंबर, १९३५ रोजीं बँक नोंदविण्यांत आली.

बँकेची व्यवस्था पहाण्यासाठी मॅनेजिंग एजन्सी फर्म असण्यास तेव्हां कायद्याचा प्रतिबंध नव्हता. परंतु प्रो. काळे ह्यांचें व माझें दोघांचेंहि मत असें होतें, कीं बँकेची व्यवस्था पहाण्यासाठी योग्य लायकीचा व अनुभवाचा पगारी मॅनेजरच असावा आणि त्याला बँकेच्या प्रगतीनुसार व त्याचेवर पडणाऱ्या जबाबदारी-नुसार पुरेसा पगार द्यावा; त्यानें संचालक मंडळाच्या पूर्ण नियंत्रणाखालीं काम करावें. प्रो. काळे व मी ह्यांचेमध्यें अलिखित असे नियम ठरलेले असत व इतर संचालकांचीहि त्यास मान्यता असे. बँकेच्या व्यवहारांत किंवा व्यवस्थेंत कोणाचेहि व्यक्तिगत हितसंबंध असूं नयेत, हा त्यांतला पहिला नियम. दुसरी गोष्ट म्हणजे, बँक ही कोणाहि एका व्यक्तीची किंवा कांहीं व्यक्तींच्या गटाची बनतां कामा नये; त्याचप्रमाणें कांहीं व्यापाऱ्यांच्या किंवा व्यक्तींच्या एखाद्या गटाचेंच हित बँकेनें पहातां कामा नये. ती खऱ्या अर्थानें महाराष्ट्राची बँक—बँक ऑफ महाराष्ट्र— झाली पाहिजे, आणि तीहि महाराष्ट्रीय ह्या संज्ञेच्या खऱ्या अर्थानें. पक्षविशिष्ट, राजकीय किंवा इतर मतांस बँकेच्या कारभारांत स्थान असतां कामा नये आणि संचालक मंडळापुढें येणाऱ्या प्रश्नांचा विचार करतांना कोणत्याहि बाह्य किंवा अप्रकृत गोष्टींस स्थान मिळतां कामा नये. बँकेची भक्कम पायावर वाढ व्हावी, हा संचालकांचा एकच ध्यास असला पाहिजे. (१) ठेवीदारांच्या पैशाची सुरक्षितता, आणि (२) महाराष्ट्रांत व्यापार-उदीम व कारखानदारी वाढावी ह्या दृष्टीनें राजकीय किंवा इतर पक्ष-विषयक विचारांपासून अलिप्त राहून सर्व पतवाल्या अर्जदारांना निर्दोष पद्धतीनें आर्थिक साहाय्य करणें, हेंच ध्येय पुढें ठेवलें होतें. आतां प्रसिद्धीस पावलेला यूनोमधील 'व्हेटो' बँकेच्या संचालक मंडळांत प्रथमपासूनच अंमलांत आहे. त्याच्या सभेंत कोणत्याहि प्रश्नावर मतें घेतलीं जात नसत; सर्व ठराव एकमतानें केले जात. संचालकांच्या सभेंत मामुली पद्धतीनें प्रश्न मांडण्यापूर्वी संचालकांशीं त्यांची खाजगी रीतीनें चर्चा केली जाई.

अगदी प्रारंभीं घेतलेले कांहीं लोक वगळले तर, बँकेनें असें धोरणच ठरविलेलें होतें, कीं तिच्या परंपरेशीं एकरूप होणारा नोकरवर्ग बँकेनेंच तयार करावा; ज्यास्त पगार देऊन इतर बँकांतील नोकरांना मोहवून आपल्याकडे आकृष्ट करूं नये. नोकरवर्गाचे व बँकेचे संबंध अत्यंत सलोख्याचे व आत्मीयतेचे रहावेत आणि त्यांना भरपूर वेतन देण्यांत यावें, ह्या अगदी प्रारंभींपासूनच्या धोरणामुळें बँकिंग अवार्डच्या अटी महाराष्ट्र बँकेस कधीच जाचक वाटल्या नाहींत. बँकेच्या दैनंदिन कारभारांत कोणत्याहि संचालकानें किंवा संचालक मंडळानें ढवळाढवळ करूं नये. फक्त धोरण संचालक मंडळानें ठरवावयाचें; अंतर्गत कारभार व्यवस्थापकानें पहावयाचा. सर्व कर्जें व गुंतवणुकी ह्यांची संचालक मंडळानें किंवा त्यानें नेमलेल्या खास समितीनें छाननी करून मंजूर करावयाची. उघड आणि गुप्त असे भक्कम रिझर्व्हज वाढवावयाचे आणि वाजवी

( पृष्ठ १४८ वर पहा )

## बँकेचें हित, हा एकच ध्यास

### प्रो. काळे ह्यांचें ऋण

लेखकः–श्री. चिं. वि. जोग, बी. कॉम., एफ. आय. बी. (लंडन)

महाराष्ट्र बँकेचें नांव माझ्या मनांत प्रथम कोणी आणलें असेल तर तें प्रो. काळे ह्यांनीं. त्यांनीं माझ्या विचारास चालना दिली, तरी माझ्या मनाचा निश्चय होईना, कारण मी दुसऱ्या एका बँकेशीं नोकरीच्या करारानें बद्ध होतों. त्या बँकेशीं माझा करार संपण्याच्या सुमारासच महाराष्ट्र बँकेच्या मॅनेजरची जागा रिकामी होऊन तिचेसाठीं अर्ज मागविण्यांत आले होते. इतर बँकांच्या कारभाराशीं माझा प्रत्यक्ष संबंध आलेला असल्याकारणानें, माझ्या प्रांतासाठीं मी काय करूं शकेन असा प्रश्न माझेपुढें नेहमीं उभा राही आणि आतां माझ्या लोकांच्यासाठीं कर्तव्य पार पाडण्याची ही संधि चालून आली होती. प्रो. काळे ह्यांनीं माझ्या मनांत भरविलेली कल्पना दृढमूल होऊं लागली. तथापि मनाची स्थिति द्विधा झाली. कांहीं मित्रांनीं ही संधि न सोडण्याचा सल्ला दिला, तर कांहींनीं विरुद्ध मत दिलें. महाराष्ट्र बँक ही कांहीं झालें तरी अगदीं लहान बँक आहे, असें ते म्हणत. परंतु प्रो. काळे ह्यांचें डायरेक्टर बोर्डावरील अस्तित्व महाराष्ट्र बँकेंत येण्याचा माझा निर्णय घडविण्यास कारणीभूत झाला. त्यामुळें, त्यांच्या हाताखालीं काम करण्याची व त्यांच्या खास मार्गदर्शनाखालीं शिकण्याची सुसंधि मला प्राप्त झाली. हा निर्णय मी घेतला, त्यांत माझी चूक झाली, असें मला कधींहि वाटलें नाहीं.

महाराष्ट्र बँकेंत दाखल झाल्यानंतर सुमारें तीन वर्षें प्रो. काळे ह्यांचे देखरेखीखालीं काम करण्याचें भाग्य मला लाभलें. इतर कोठेंहि मला शिकावयास मिळाल्या नसत्या, अशा किती तरी महत्त्वाच्या गोष्टी मला येथें शिकावयास मिळाल्या. प्रो. काळे ह्यांच्यासारख्याच्या तज्ज्ञ मार्गदर्शनाखालीं परंतु स्वतंत्रपणें मला काम करतां आलें. कोणत्याहि प्रश्नाचा विचार करतांना ते बँकिंगच्या मूलभूत तत्त्वाची नेहमीं कसोटी लावीत. त्यापासून यत्किंचितहि ढळण्यास ते तयार नसत; दिलीच तर इतर बाबतींत ते सवलत देत. एकादी सूचना मला आकर्षक व बँकेच्या दृष्टीनें किफायतशीर अशी वाटली, तरी त्याबाबत मी प्रो. काळे ह्यांच्याशीं चर्चा करूं लागलों म्हणजे ते त्या सूचनेस पार फेटाळून लावीत, असें कित्येक वेळां झालें आहे. मी प्रथम प्रथम निराश होई, परंतु मी त्यांचे दृष्टिकोनांतून पाहूं लागलों म्हणजे मलाच त्या सूचनेंतील धोक्यांचीं स्थळें स्पष्ट दिसूं लागत आणि त्यांची भीति बहुतेक वेळां खरी ठरलेली आढळे. प्रत्येक प्रश्नाचा त्याच्या स्वतःच्या गुणदोषानुसार विचार करावयाचा; व्यक्तींचा किंवा बँकेच्या संभाव्य तात्कालिक नफ्याचा विचार बाजूस ठेवावयाचा, हें त्यांनीं मला शिकविलें. कांहीं मूलग्राही तत्त्वांवरील त्यांच्या विश्वासाचें एक उदाहरण देतों. बँकेचे पैसे सरकारी रोख्यांत गुंतवावयाचे ते अल्प मुदतीच्या रोख्यांतच गुंतवावयाचे; बिनमुदतीच्या रोख्यांत मुळीच गुंतवावयाचे नाहींत, असा त्यांचा नेहमीं आग्रह असे. युद्धकाळांत बिनमुदतीचे व दीर्घमुदतीचे रोखे गुंतवणुकीच्या दृष्टीनें आकर्षक वाटत होते. त्यांत पैसे गुंतविण्याची सूचना पुढें आली, तर ते निग्रहपूर्वक बाजूस टाकीत. बँकरेट नोव्हेंबर, १९५१ मध्यें वाढविण्यांत आला, तेव्हां प्रो. काळे ह्यांच्या म्हणण्याचा दाखला सर्वांना आला.

पहिलीं सात वर्षें चेअरमन म्हणून व पुढें तीन वर्षें डायरेक्टर ह्या नात्यानें त्यांच्या नेतृत्वाखालीं जीं तत्त्वें व जे संकेत घालून देण्यांत आले, त्यांना महाराष्ट्र बँकेच्या प्रगतीचें मोठें श्रेय दिलें पाहिजे. चेअरमन म्हणून ते निवृत्त झाल्यावरहि त्यांचा सल्ला वरचेवर घेण्यांत येत असे. त्यांच्या घरीं जाऊन, बँकिंगविषयक प्रश्नांची शास्त्रीय चर्चा मोकळ्या मनानें, व्यक्तींचा विचार बाजूस ठेवून, करण्याची संधि मला मिळे व त्यांत मला अत्यंत आनंद लाभे. बँकेचा पाया मजबूत करण्याच्या एकाच कसोटीवर त्यांची कृति अवलंबून असे. त्यांना 'कॉंझरवेटिव्ह' बँकर म्हणून दूषण देण्यांत येत असे; परंतु म्हणून ठरलेलें धोरण यत्किंचितहि बदलण्यास ते तयार नसत. इंग्लिश बँका त्यांचीं मजबुती कशी वाढवितात, ह्याचीं उदाहरणें ते नेहमीं देत व त्यासाठीं त्यांना किती वेळ लागला ह्याचीहि आठवण करून देत.

प्रो. काळे ह्यांनीं प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रीतीनें माझेसाठीं जें केलें त्याबद्दल जाहीरपणें कृतज्ञता व्यक्त करण्याची ही सुसंधि मी घेत आहें. त्यांनींच मला येथें आणलें व मला माझ्या कामांत प्रोत्साहन दिलें, म्हणून महाराष्ट्रासाठीं माझ्या कुवतीप्रमाणें शक्य तें मी करूं शकलों. माझ्यावरील त्यांच्या नितांत विश्वासामुळें मला माझ्या कामांत स्फूर्ति व चैतन्य वाटत असे. त्यांच्या मृत्यूनंतरहि, बँकेच्या कचेरींतील त्यांच्या तसबिरीच्या दर्शनानें जरूरीच्या वेळीं मला योग्य तें मार्गदर्शन घडतें, हें नमूद करण्यास मला आनंद वाटतो.

---

( पृष्ठ १४७ वरून चालू )

स्थिर दरानें डिव्हिडंड वाटावयाचें. नव्या शाखा उघडण्याची घाई करावयाची नाहीं. नव्या शाखेचा पहिल्या कांहीं वर्षांचा तोटा सहज भरून काढतां येईल, एवढी वार्षिक नफ्यांत कूस रहात असेल तरच नवीन शाखा काढावयाची; त्याखेरीज नाहीं. त्याचप्रमाणें, शाखांच्या देखरेखीची व तपासणीची योग्य व्यवस्था करावयाची. ज्या जिंदगीला बाजारांत किंमत नाहीं, अशा जिंदगीला ताळेबंदांत स्थानच द्यावयाचें नाहीं. सर्व नाममात्र जिंदगी त्या त्या वर्षाच्या नफा–तोटा पत्रकांत लिहून टाकावयाची. बँकिंगच्या धंद्याचें वैशिष्ट्य लक्षांत ठेवून भागीदारांना देतां येईल तेवढी भरपूर माहिती पुरवावयाची. धंदा मिळविण्यासाठीं व्यापारी किंवा सहकारी बँकांशीं स्पर्धा करावयाची नाहीं. प्रो. काळे ह्यांनीं नेमून दिलेल्या ह्या अत्यंत इष्ट व हितकारक संकेतांमुळें १९४९ च्या बँकिंग कंपनीज कायद्याच्या कोणत्याहि कलमांत व्यवहार बसविण्याची बँकेला कधींहि यत्किंचितसुद्धा अडचण पडली नाहीं. बँकेच्या ह्या सुरक्षितपणाच्या धोरणामुळें, तिनें पैसे गुंतविणाऱ्या वर्गाचा विश्वास संपादन केला आहे आणि तिची सालोसाल अखंड प्रगति होत आहे.

प्रो. काळे ह्यांनीं बँकेचा पाया मजबूत बसविला; स्वतःचें महत्त्व वाढविणें किंवा स्वतःची जाहिरात करणें ह्यांपासून ते पूर्णपणें अलिप्त होते. बँक ऑफ महाराष्ट्र ही महाराष्ट्रीय सुशिक्षित तरुण अधिकाऱ्यांनीं चालविलेली एक आदर्श बँक व्हावी, असा त्यांचा कटाक्ष होता. प्रो. काळे ह्यांनीं आपल्या हयातींतच श्री. धोंडूमामा साठे ह्यांची अध्यक्ष म्हणून योजना केली व त्यानंतर अखेरपर्यंत ते संचालक मंडळाचे एक साधे सदस्य म्हणून राहिले, ह्यावरूनच त्यांची स्वार्थत्यागी व विरक्त वृत्ति दिसून येते.

## प्रो. काळे व महाराष्ट्र बँक

( लेखकः—श्री. ग. ल. हळबे, बी. ए., ए. आय. आय. बी. )

प्रो. काळे यांचा व माझा प्रत्यक्ष असा संबंध १९३७ पासून आला. संचालक मंडळाच्या प्रत्येक सभेस मला हजर रहावें लागत असल्यामुळें सभेमध्यें होणाऱ्या चर्चेवरून ते बँकेच्या कारभाराकडे किती काटेकोरपणें पहात असत हें दिसून येत असे. कर्जें मंजूर करतेवेळीं कर्जदाराची पूर्ण माहिती मिळवून नंतरच त्याला कर्ज देण्याचा विचार केला जात असे. कर्जदाराचें चारित्र्य कसें आहे, त्याची बाजारांत पत काय आहे, कर्जाऊ दिलेला पैसा तो वेळेवर अगर बँक मागणी करील तेव्हां परत देऊं शकेल किंवा कसे, धंदा किती दिवस चालूं आहे, तो सट्टेबाजीचा व्यवहार करतो किंवा कसे, वगैरे सर्व गोष्टींचा विचार करून नंतरच निर्णय घेण्यांत येत असे. केवळ अमका मनुष्य एखाद्या संचालकाच्या माहितीचा आहे म्हणून कर्ज मंजूर केलें जात नसे.

महाराष्ट्र बँक स्थापन होण्यापूर्वीं प्रांतिक सहकारी बँकेमध्यें व जिल्हा सहकारी बँकमध्यें व इतर बऱ्याच लिमिटेड कंपन्यांमध्यें संचालक मंडळाचे डायरेक्टर व चेअरमन अशा निरनिराळया भूमिकेमध्यें प्रो. काळे यांना कामाच्या आलेल्या अनुभवाचा फायदा बँकेस सुरवातीपासूनच मिळत गेला. कांहीं बँका साडे तीन टक्के नॉनटर्मिनेबल (बिनमुदतीच्या) सरकारी कर्जरोख्यांमध्यें पैसा गुंतवून त्याचे खरेदीविक्रीमध्यें बराचसा नफा मिळवीत असत. परंतु सदर व्यवहारामध्यें तोटा येण्याचा फारच संभव असतो याची प्रो. काळे यांना पूर्ण जाणीव असल्यामुळें सदर नॉनटर्मिनेबल सिक्युरिटीजमध्यें पैसा गुंतवावयाचा नाहीं असें त्यांनीं ठरविलें होतें. सारांश, ज्या व्यवहारामध्यें सट्टेबाजी आहे असा कोणताहि व्यवहार बँकेनें करावयाचा नाहीं, नफा कमी झाला तरी हरकत नाहीं, हें त्यांचें धोरण होतें.

बँकेस मॅनेजिंग डायरेक्टर असूं नये असें त्यांचें ठाम मत होतें. १९४९ च्या बँकिंग कायद्यामध्यें मॅनेजिंग डायरेक्टर ही जागा पांच वर्षांपेक्षां जास्त काल असूं नये अशी जी तरतूद करण्यांत आली आहे, त्यावरून प्रो. काळे यांचें धोरण किती दूरदृष्टीचें होतें हें दिसून येतें.

दैनंदिन कारभारांत ते ढवळाढवळ करीत नसत; परंतु बँकेचा कारभार कसा चालला आहे याकडे त्यांचें पूर्ण लक्ष असे. बँकेंतील नोकरवर्गाकडेहि त्यांचें बारकाईनें लक्ष असे. बँकेचा व्याप जसजसा वाढत गेला त्या प्रमाणांत नोकरवर्गास पगारवाढ तत्परतेनें दिली.

आपल्या बँकेचा ताळेबंद सेंट्रल बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ इंडिया, यांच्या ताळेबंदांच्या तोडीचा असावा अशी त्यांची नेहमीं इच्छा असे व त्याप्रमाणें नफावाटणीचे वेळीं तें धोरण पुढें ठेवून निरनिराळ्या बाबींकरतां योग्य ती तरतूद केली जात असे.

महाराष्ट्र बँक निघाली त्यावेळीं अगर त्यानंतर पुढेंहि बरींच वर्षे बँकांवर असावें तसें नियंत्रण नव्हतें. त्यामुळें कर्जें वगैरे मंजूर करण्यामध्यें, सरकारी कर्जरोख्यांमध्यें पैसे गुंतविण्यामध्यें, अगर तरता पैसा किती ठेवावा यामध्यें एकसूत्रीपणा नव्हता. त्यामुळें बऱ्याच बँका व्याजाच्या आशेनें आपापल्या कल्पनेप्रमाणें घरें, जमिनी, वगैरे तारणावर लांब मुदतीचीं कर्जें मंजूर करीत. अशा दिलेल्या कर्जांची परतफेड मुदतीमध्यें अगर जरूर लागेल त्यावेळीं होत नसे. या सर्व गोष्टी विचारांत घेऊन महाराष्ट्र बँकेमध्यें घराच्या तारणावर लांब मुदतीचीं फारच थोड्या प्रमाणांत कर्जें दिलीं जात. अर्थात, रिझर्व्ह बँकेच्या सूचनेप्रमाणें आतां अशीं कर्जें देण्याचें बहुतेक बँकांनीं जवळ जवळ बंदच केलें आहे.

कर्जें देण्याबाबतचे अगर सरकारी कर्जरोख्यामध्यें पैसे गुंतविण्याबाबतचें आपलें धोरण बरोबर आहे किंवा नाहीं याची खात्री करून घेण्याकरतां रिझर्व्ह बँकेकडून त्यासंबंधींचे फॉर्मस् आपण होऊन मागवून त्यांना सर्व माहिती पुरविली जात असे व रिझर्व्ह बँकेचा अभिप्राय विचारला जात असे. ह्यावरून त्यांचें धोरण किती सावधगिरीचें होतें हें दिसून येतें.

वरील धोरणानुसार महाराष्ट्र बँकेचा कारभार पहिल्यापासूनच सावधगिरीनें चालत असल्यामुळें तिचा पाया भक्कम घातला गेला. प्रो. काळे यांनीं घालून दिलेलें तेंच सावधगिरीचें धोरण अद्यापि चालूं असल्यामुळें महाराष्ट्राची अग्रेसर बँक म्हणून तिची ख्याति होऊं लागली आहे. पुढील नजिकच्या काळांत हिंदुस्थानांतील एक नमुनेदार बँक म्हणून मोठ्या पांच बँकांमध्यें तिची गणना होईल, अशी आशा करण्यास मुळींच हरकत नाहीं.

### महाराष्ट्र बँकेची स्थापना—खरी राष्ट्रसेवा


"स्वदेशी धंद्यांचें पुनरुज्जीवन व्हावें व आर्थिक क्षेत्रांतील आपलें पहिलें स्थान पुनः आपणांस मिळावें असा प्रयत्न करणें हीच खरी देशभक्ति समजली पाहिजे. ह्या दृष्टीनें पहातां महाराष्ट्र बँकेसारख्या संस्थेची स्थापना, ही राष्ट्रसेवाच—गाजावाजा न करतां केलेली सेवा—समजली पाहिजे. महाराष्ट्र बँकेचे अधिकारी आपली समाजहितसंबंधाची जबाबदारी पूर्णपणें ओळखतात ह्याबद्दल माझी खात्री आहे व धोक्याचीं स्थळें ते टाळतील, ह्याबद्दल मला शंका नाहीं."—सर सोराबजी पोचखानवाला ह्यांचें बँकेच्या उद्घाटनप्रसंगीं भाषण (८–२–१९३६).

### बँकेचा ताजा ताळेबंद
### (३१–१२–१९५२)

| | रु. | | रु. |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | १६,००,००० | कॅश, बँक बॅलेन्सेस | |
| कॉल्स इन् अडवान्स | १५० | | ३७,५०,६२२ |
| रिझर्व्हज् | ५,६५,००० | इन्व्हेस्टमेंट्स | १,२१,३९,८७४ |
| ठेवी | २,८१,६२,६११ | कर्जें | १,४१,०६,४४५ |
| इतर देणीं | १८,७३,३३३ | इमारत, इ. | ६,९८,९५९ |
| नफा | ३,०९,३७० | इतर जिंदगी | १८,१४,५६८ |
| | ३,२५,१०,४६४ | | ३,२५,१०,४६४ |

### क्रिकेट क्षेत्रांतहि अग्रेसर

महाराष्ट्र बँकेनें चालू वर्षीं सुरू झालेल्या पुणें येथील बँकांबँकांतील क्रिकेट सामन्यांत भाग घेऊन 'पुरोहित ट्रॉफी' मिळविली. प्रो. दि. ब. देवधर ह्यांच्या हस्तें क्लब ऑफ महाराष्ट्रवर बक्षीस समारंभ झाला.



(१) प्रो. देवधर. (२) श्री. बाळासाहेब पुरोहित. (३) महाराष्ट्र बँक संघाचे नायक, श्री. सरदेसाई.

# आर्थिक सातत्याकरितां क्रांति

( लेखकः—श्री. ह. वां. काणे, बी. एससी. )

आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या देवघेवींच्या हल्लींच्या पद्धतींमुळें एकमेकांचा फायदाच नेहमीं होतो असें घडत नाहीं व म्हणून अनेक प्रकारच्या अडचणी उत्पन्न होतात यांत शंका नाहीं. याचें कारण असें कीं, हल्लीं ज्या पद्धतीनें व्यवहार चालू आहेत त्यामुळें अनेक वेळेला अशी चमत्कारिक परिस्थिति निर्माण होते, कीं जीं राष्ट्रें धनको असतात तीं नेहमींच धनको राहतात व ऋणको असतात त्यांचा दर्जा बदलण्याचें कधींच ठळत नाहीं; तीं नेहमीं ऋणकोच रहातात. त्यांना झालेलें ऋण हें न फेडल्या जाणाऱ्या ऋणासारखें कायम रहातें. आपण यास अनिर्वाह्य ऋण म्हणूं या. अशा प्रकारच्या परिस्थितींतून कांहीं मार्ग काढतां येईल कीं कसें तें पहावें, असा या लेखाचा उद्देश आहे.

धनको आणि ऋणको यांचेमधील संबंध बहुधा कधींच सलोख्याचे असत नाहींत हें आपण नेहमीं पाहतों. ऋणको हा त्याचे ऋणाचे पैसे फेडावयास तयार आहे परंतु ( पठाणी धनको म्हणत असतो कीं मला मुद्दल फेड नकोच आहे, फक्त व्याजच देत रहा, या न्यायाप्रमाणें ) धनको मुद्दल फेडून घ्यावयासच तयार नाहीं. पण तरीहि समोरचा ऋणको हा माझा ऋणकोच आहे असा आग्रह धरू लागला म्हणजे उघडच या पक्षामध्यें भांडण जुंपतें. एका उदाहरणानें स्पष्ट करूं या. न्यूझीलंडनें इंग्लंडकडून कर्ज काढलें. या रकमेवरील थकलेलें व्याज न्यूझीलंड कांहीं रोख रकमेनें देऊं शकत नव्हतें म्हणून त्यांचे पंतप्रधानानें इंग्लंडला या व्याजाचे रोख रकमेचे बदलांत स्वराष्ट्रांतील वस्तूंची निपजेच्या मुबलक पुरवठ्यामधून ( मेंढ्या, लोणी, लोकर इ. ) देऊन करूं या असें सुचविलें. परंतु ही गोष्ट १९३६ सालीं इंग्लंडला पटेना व न्यूझीलंडचे पंतप्रधानास हात हलवीत जावें लागलें. अर्थात् इंग्लंडसेरीज इतर राष्ट्रें कोणी हा त्याचा माल स्वीकारतील काय याची चौकशी करतां तिकडूनहि निराशाच झाली.

म्हणजे पहा कसें तें. न्यूझीलंडला आपलें कर्जाचें व्याज देण्याची इच्छा आहे. व तें देण्याकरतां ब्रिटिश पौंड त्यांस मिळविले पाहिजेत. ते मिळविण्याकरतां एक तर ब्रिटिशांसच माल विकला पाहिजे किंवा सदर माल त्यांनीं अशा राष्ट्रांस विकला पाहिजे कीं ज्यांचेकडे ब्रिटिशांचें पौंडी येणें आहे. परंतु गंमत अशी कीं त्यांचा मेंढ्या, लोणी, लोकर इत्यादि माल ब्रिटिशांसहि नको होता आणि इतरहि कोणा राष्ट्रांस नको होता. म्हणजेच न्यूझीलंडला इंग्लंडचें कर्जाचें व्याज व कर्ज देण्याची इच्छा असूनही त्याचें कर्ज हें अनिर्वाह्य कर्ज म्हणून शिल्लक रहातें. आतां हें कर्ज—व्याज जर ठराविक तारखेस राष्ट्राची अब्रू संभाळण्याकरतां भरावयाचेंच असें ठरलें, तर यास मार्ग एकच व तो म्हणजे न्यूझीलंडनें फिरून इंग्लंडमध्येंच परत पहिलें कर्ज फेडण्याकरतां नवीन कर्ज काढावयाचें. हें कर्ज काढण्याकरतां इंग्लंडनें परवानगीहि दिली. परंतु त्यासाठी पेन्शनचे दर व इतर देणीं यांचें प्रमाण उतरविण्याची नामुष्कीची अट घालूनच दिली.

वास्तविक इंग्लंडला आवश्यक गरजेच्या अशा लोणी, लोकर, इ. वस्तू व्याजाच्या मोबदल्यांत घेतां आल्या असत्या व त्यामुळें इंग्लंडमधील जनतेलाहि बरें वाटलें असतें, व न्यूझीलंडचेंहि त्यामुळें काम भागून इंग्लंडचें फिरून कर्ज काढण्याची ( व तेंही नामुष्कीच्या अटी स्वतःवर लादून घेऊन ) पाळी आली नसती. परंतु इंग्लंड जर असें न करतें तर स्वतंत्र वसाहतीच्या न्यूझीलंडच्या अंतर्गत व्यवहारांत एरव्हीं उद्दामपणानें ढवळाढवळ कशी करतां आली असती ? परंतु ही स्थिति १९३६ सालची झाली. पण आतां १९५२ साल उलटून गेलें आहे व इंग्लंडचा कर्जबाजारीपणा जगजाहीर झाला आहे व म्हणून त्यास आतां आतांपर्यंत च्या रुळलेल्या कर्जफेडीच्या रूढींमध्यें फरक करण्याची आवश्यकता वाटूं लागली आहे.

आतां इंग्लंड आपली आयात कमी करण्याच्या मार्गास लागला आहे व याचा परिणाम इंग्लंडच्या कमी झालेल्या रहाणीच्या मानामध्यें दिसून येऊं लागला आहे. परंतु या पद्धतीमुळें ( फक्त इंग्लंडवरच परिणाम झाला असें नव्हे तर ) इतर राष्ट्रांवरहि दूरगामी परिणाम झाला आहे. ज्या देशांतील कच्च्या मालाचें इंग्लंड हें एकमेव गिऱ्हाइक होतें त्यांना अन्यत्र मागणी नसल्यामुळें त्या राष्ट्रांचा धंदा अजिबात बसला. यामुळें त्यांचे देशांतील नाणेबाजार मोडकळीस आला व त्यांस इतर देशांतून त्यांचे स्वतःकरतांहि कच्चा माल मागविणें बंद अगर कमी करावें लागलें.

“ निर्यात वाढवा, नाहीं तर नष्ट व्हा.” असें इंग्लंडचें सध्यांचें घोषवाक्य आहे. जपान व जर्मनी आतां युद्धोत्तर आपआपली निर्मितीची कमाल किमया दाखवूं लागल्याबरोबर इंग्लंडचे डोळे खाडकन् उघडले व त्यांनीं तसें निर्मितिक्षम बनूं नये अशाकरतां अनेक खोडे घालण्याचा इंग्लंडचा प्रयत्न झाला. परंतु अमेरिकेपुढें इंग्लंडची मात्रा सध्यां तरी चालत नाहीं. जपान व जर्मनी यांची कन्झ्यूमर गुड्सचे निर्मितीमुळें आशिया, आफ्रिका या दोन्ही निर्धन खंडांतील जनता अधिकाधिक सुखी होणार हें उघड दिसत आहे, व या अत्यंत मागासलेल्या दरिद्री अशा दोन खंडांकरतां जगांतील अन्य राष्ट्रांनीं कितीहि उत्पादन केलें तरी तें ( निदान कांहीं वर्षें तरी ) कमीच पडेल. अशी जरी परिस्थिति असली तरी त्यामुळें इंग्लंडचे पोटांत दुखतें ना ! जगांत निर्माण झालेल्या संपत्तीपैकी प्रत्येक व्यक्तीचे वांट्यास जर थोडी अधिक संपत्ति आली व त्यास ती जर सुखानें उपभोगावयास मिळाली तर, खरें म्हणजे, उदार—मनस्क मनुष्यास आनंद वाटावयास पाहिजे.

युद्धांच्या खाईत पडल्यामुळें जीं राष्ट्रें नित्य जीवनोपयोगी वस्तू निर्माण करीत नव्हतीं, तीं आतां तशीं निर्मिति करूं लागलीं तर ही चांगली गोष्ट घडत आहे, असेंच इंग्लंडला वाटावयास पाहिजे होतें. परंतु हीच गोष्ट नेमकी त्याचे दुःखास कारणीभूत झाली आहे.

व्यापारउदिमाच्या धोरणांत आमूलाग्र बदल करण्याचा प्रयत्न, धोका पत्करूनहि करून पहाण्याची वेळ अशाच वेळीं असते. मुक्तराष्ट्रांच्या मानगुटीवर जर्मनीचा ( व आतां रशियाचा ) पाश दिवसेंदिवस आवळला जात आहे असें दिसतांच अमेरिकेच्या प्रे. रुझवेल्टनें “ लीज लेंडचें ” तत्त्व प्रत्यक्षांत उतरविलें, व इंग्लंडला “तुम्हीं प्रयत्नाची शर्थ करा, आम्ही तुमचे मदतीस आहोंत असें सांगितलें. तावत्कालीन जागतिक देण्याघेण्याचे जे रुळलेले मार्ग होते त्यांत या लीजलेंडनें क्रांतिकारक बदल करून दाखविला. लीजलेंडचें रूपांतर पुढें परस्पर मदत (म्युच्युअल एड) यामध्यें झालें, व युद्धवस्तुनिर्मितीला यांतून भांडवल मिळालें. इतकेंच नव्हें, तर हें भांडवल वाटेल त्या राष्ट्रालाहि मिळालें; मात्र तें जर्मनविरोधी असावें एवढाच दंडक होता. शिवाय या मदतींचे पिछाडीस कर्ज हा शब्दहि वा त्याची सावलीहि नव्हती. म्हणू—

-नच ही मदत स्वीकारतांना अगर देतांना कोणाचींहि तोंडें आवंट झालेलीं नाहींत. हें सर्व शत्रूला नेस्तनाबूद करीपर्यंत जमलें तर या जर्मन सजीव शत्रूखेरीज मनुष्याचे इतर निसर्गांतील शत्रू गरिबी, भुक, आजार हे काय कमी का जबरदस्त आहेत ? जागतिक भूकबळी, रोगग्रस्तता आणि दैन्यानें कळंजलेलेपणा जें हरघडी हर ठिकाणीं दिसतें या शत्रूंशीं लढा देतांना मात्र आपण युद्धाकरतां स्वीकारलेलें औदार्यतेचें धोरण संभाळण्यास कां कांकूं करतों ? त्यावेळीं मात्र बाजारपेठेची मालकी, हुकुमशाही, मक्ते, वगैरे वगैरे सर्व एकाच जुन्या मोठ्या राष्ट्राचे असावेत असा अवास्तव आग्रह धरला जावा हें आश्चर्य नव्हे काय ? जागतिक युद्ध संपतांच परस्पर मदतीचें तत्त्वहि निकालांत निघालें ही युद्धोत्तर घटनाही मोठी दुःखद होय. अमेरिकेनें तरीही यांतून थोडा मार्ग काढण्याकरतां "मार्शल योजना" म्हणून अंशतः नवीन काढली परंतु या आपत्तींतून मोकळें व्हावयाचें असेल आणि जागतिक शांतता हवी असेल तर यापेक्षां कांहींतरी बरेंच अधिक व्हावयास पाहिजे.

कोणी असें म्हणतील कीं युद्धोत्तर परस्पर मदतीचें तत्त्व अंमलांत राहूं शकणार नाहीं. परंतु प्रत्यक्षांतच आज "युनायटेड स्टेट्स ऑफ युरोप" जमूं घातलें आहे. कोळसा आणि पोलाद करतां श्यूमन योजना पुढें आलेली आहे, व अन्नधान्यवाढीकरतां ग्रिमजिन योजनाहि जारी झाली आहे. तसेच अटलांटिक महासागराभोंवतालचे राष्ट्रांनीं परस्पर-सहाय्यक मंडळही सुरू केलें आहे. आंतर-राष्ट्रीय मदतीची बरीचशी जुळवाजुळव झाली आहे.

आंतरराष्ट्रीय देवघेवीचे व्यवहाराकडे वळल्यास अनृ-ऋणीं होण्यांतील ज्या अनिश्चित्य अडचणीचा धागा आहे तो दूरें व्हावयास पाहिजे आहे. असा कांहीं मार्ग निघाला पाहिजे कीं जीं राष्ट्रें ऋणको आहेत त्यांस त्यांच्या देशांत निर्माण होणाऱ्या वस्तूंच्या बदलीनें त्यांस परदेशांतून हव्या असणाऱ्या वस्तू खरीदतां आल्या पाहिजेत. जर धनको राष्ट्रानें अशा बदलीस तात्काळ मान्यता न दिली तर कांहीं काळानंतर सदर ऋणकोचें सदर धनकोस द्यावयाचें कर्ज आपोआपच नष्ट झालें असें समजावयाचें. प्रथम दर्शनी हें नवीन तत्त्व जितकें विचित्र वाटेल तितकें तें विचित्र नाहीं. कारण हल्लीच्या पद्धतींत ऋणको राष्ट्रास एकदां अशी वेळ येते कीं सदर ऋण देतां येत नाहीं असें स्वच्छ म्हणावयाचें. अर्थात् या दोघांमध्यें शत्रुत्व निर्माण होतें आणि आपलें उद्दिष्ट मात्र सलोखा वाढावा असें आहे. या नवीन तत्त्वानें हा सलोखा वाढेल व शत्रुत्व नष्ट होईल.

लंडन चेंबर ऑफ कॉमर्स व होलसेल टेक्स्टाइल असोसिएशन या दोन संस्थांनीं वरील तत्त्व आचारांत आणून दाखविलें आहे. श्री. एडवर्ड हॉलोवे यांनीं तें खालीलप्रमाणें प्रतिपादलें आहे:—

प्रत्येक राष्ट्रानें स्वतःची सर्व निसर्गदत्त संपत्तीची (रिसोर्सेसची) पराकाष्ठेची निपज करण्याचा प्रयत्न केला पाहिजे; व आपली अंतर्देशीय अर्थव्यवस्था अशी ठेवली पाहिजे कीं ज्यामुळें स्वतःची परदेशी वस्तु खरेदी करण्याची ताकत व आपला कच्चा माल विकून स्वदेशांत येणारा पैसा यांचा मेळ नेहमीं महिनेमहा बसविता आला पाहिजे.

या बाबतींतील जागतिक विनिमयाचे नियम वरील व्यवहाराला धरूनच ठरविले पाहिजेत. 'अ' जेव्हां 'ब' ला वस्तु विकत देतो तेव्हां "ब" चे नांवें "अ" सदर वस्तु विक्रीची किंमत लिहितो व या रकमेइतका माल "ब" नें "अ" कडून केव्हांही घेऊन जावें. याप्रमाणें "अ" नें "ब" चे नांवें लिहिलेली रक्कम "अ" ला मिळाल्यासारखीच असते. फक्त "ब" नें "अ" कडून "ब" ला लागणारी व "अ" जवळ असणारी वस्तु केव्हां उचलावयाची येवढेंच काय तें घडावयाचें असतें व सदर वस्तु "अ" कडून विकत घेण्याचा अधिकार बजवावयाचा कीं नाहीं बजवावयाचा तें "ब" नें ठरवावयाचें असतें. "अ" चें म्हणणें असें कीं हा "ब" नें अधिकार बजावण्याची शिकस्त काळमर्यादा, उभयतांनीं गोडीनें बैठकींत बसून ठरविलेली अशी समजा, सात वर्षांची असावी आणि या सात वर्षांच्या मर्यादित कालखंडाचे आंत जर "ब" नें आपला "अ" कडील तावद् रकमेपर्यंतचे वस्तू खरेदीचा अधिकार बजावला नाहीं तर सदर काळमर्यादेपुढें सदर रक्कम वसूल करण्याचा "ब" चा अधिकार संपवून टाकावयाचा असें "कर्जखंडन कालमर्यादा कायद्या"-नुसारच ठरवून टाकावयाचें.

असें घडूं शकेल कीं "ब" ला लागणारी वस्तु "अ" जवळ नसेलही. अशा वेळीं "परस्पर आंतरराष्ट्रीय देवघेव मंडळद्वारां" "ब" नें सदर माल "अ" चे ऐवजी "क" कडून घेण्यास हरकत नाहीं. मात्र "क" हा "अ" चें तितकें देणें लागत असला पाहिजे.

राष्ट्राराष्ट्रांमधील देवाण-घेवाण समतोल रहाण्याकरतां राष्ट्रांतील एकमेकांचे हुंडणावळीचे दर अर्थातच ठरविले पाहिजेत, आणि एकदा असा हुंडणावळीचा रास्त दर ठरला कीं तो सर्वांनीं प्रयत्नतः कायम ठेवावयास हवा. तसेंच सध्यां जे आंतरराष्ट्रीय व्यापाराचे जे जे सर्वसंमत मार्ग व्यवहारमान्य झाले ले आहेत ते ते या तत्त्वास धरून व्हावयास पाहिजेत.

यामध्यें नवीन असें कांहीं नाहीं. जगांतील बहुतांशी व्यवहार याच पद्धतीनें होतो. परंतु आधींच वर सांगितल्याप्रमाणें एकमेकांचे एकमेकांशीं झालेल्या व्यवहारांतील वजावट झाल्यानंतर किरकोळ बाकीचें जें देणें अगर घेणें उरतें ती रक्कम मात्र एकमेकांस खटकत असते. ही जी रक्कम उरते तिचे संबधींच वर विस्तरशः सांगितल्याप्रमाचें अमुक इतक्या वर्षांचे आंत अधिक व्यवहार करून जर सदर वजावट रकमेइतक्या व्यवहारानें बाकी पूज्य करून जर घेतली नाहीं तर "कर्ज खंडन कालमर्यादा कायद्यानुसार" सदर देणें अगर घेणें बादच झालें असें समजावयाचें.

वरील व्यवहारपद्धतींना वरील दोन संस्थांखेरीज दक्षिण आफ्रिकेंतील जोहॅन्सबर्गच्या व्यापारी मंडळानें संमति दिली आहे सारांश, ब्रिटिश राष्ट्रकुळांतील सर्व घटकांस ही व्यवस्था मान्य होऊं शकेल. आज जगांतील सर्वांना बडे धनको राष्ट्र जें "अमेरिका" त्यासही वरील विचारसरणी मान्य असावी असें दिसतें. युनायटेड स्टेटस् व इतर राष्ट्रें यांचेमधील व्यापारी व्यवहार न्यूयॉर्कमध्यें उघडलेल्या (क्लिअरिंग हाऊस) "आंतरराष्ट्रीय बटवडा गृह" मधून व्हावेत. फ्रेंच मनुष्यास अमेरिकन वस्तु हवी असल्यास त्यानें वरील गृहामार्फत घ्यावी. अमेरिकनास त्या वस्तूची किंमत डॉलरमध्यें मिळेल व फ्रेंच मनुष्य मात्र सदर किंमत त्यांच्या फ्रॅंच्याच नाण्यांनीं भरेल, व सदर रकमेपुरती एक काळमर्यादा अमेरिकेस दिली जाईल. या मर्यादित मुदतींत जर अमेरिकेनें फ्रान्समधून वरील रकमेपर्यंत कांहीं माल सदर आंतरराष्ट्रीय बटवडा गृहामार्फत जर खरेदी केला नाहीं, तर सदर कालमर्यादेअखेर सदर रक्कम फ्रान्समधून अमेरिकेस कधींच मिळावयाची नाहीं.

यांत अन्याय मानण्याचें कारण नाहीं. याचें खंडन असें कीं, या पद्धतीमुळें सर्व व्यवहार बटवडा पेढीमार्फत होत असल्यामुळें प्रत्यक्ष व्यवहार होऊन गेल्यानंतर ५-७ वर्षांनीं सदर क्रेडिट बंद

होत असल्यामुळें कोणच्याहि मूळ व्यक्तींचें नुकसान यामुळें होत नाहीं व म्हणून त्यांना वैयक्तिक झळ बसली अगर बसत आहे असें वाटत नाहीं. ज्यांना त्यावेळीं वस्तु विकावयाची होती त्यावेळीं त्यांनीं ती विकली व ज्यांनीं खरेदी करावयाची त्यांनीं खरेदी केली व त्यावेळचे हिशेब सदर पेढीनें करून टाकले. त्यावेळेची देवाणघेवाणमधील बाकीबाबत तंट्याचें मूळ पेढीनें ५-७ वर्षांनीं प्रकरण निकालीं काढून टाकून उभयराष्ट्रांनीं विसरून जाण्यांतच एकमेकांतील कडवटपणा शिल्लक रहात नाहीं व पुढील जादा फायदेशीर व्यवहार सुरळितपणें चालू रहातात. बुजवणाऱ्या मागील आठवणी शिल्लकच ठेवल्या जात नाहींत, व आंतरराष्ट्रीय तेढीं निर्माण होण्याचा संभव ठेवला जात नाहीं.

हीच ती आर्थिक देवाण-घेवाण पूर्वीचे व्यवहारांतील वजावटीचें शल्य विसरवून टाकणारी व म्हणून आर्थिक व्यवहार सातत्य ठेवणारी क्रांतिकारी पद्धत होय. ही स्वीकारण्यांत कांहीं नवीन पायंडा पाडावा लागत नाहीं. तसेंच सर्वच राष्ट्रांनीं एकसमयावच्छेदेंकरून संमति दिल्याशिवाय ही पद्धत सुरू करतां यावयाची नाहीं असेंहि नाहीं. जीं जीं राष्ट्रें यास संमति देतील त्यांनीं याप्रमाणें एकमेकांत व्यवहार तावडतोब सुरू करावेत.

इंग्लंड व इंग्लंडच्या वसाहती यांनीं याप्रमाणें ठरविलें व त्यांत पश्चिम युरोपीय राष्ट्रांनीं सामील व्हावयाचें ठरविलें तर चांगल्या कार्याकरतां मोठ्या शक्ती एकत्र आल्या असें होईल; व या खऱ्या सहकार्याचा परिणाम अधिक धनसंपत्तीच्या निर्मितींत होईल. या राष्ट्रांतील प्रत्येक व्यक्तीचें जीवमान अधिक संपन्न होईल व त्यामुळें विध्वंसक प्रवृत्तींना आळा घालण्याचें जगाचें सामर्थ्य वाढत जाईल. जपान-जर्मनीसारख्या राष्ट्रांना वरील गटामध्यें वरील अटींनुसार सामील करून घेतल्यास त्यास धनसंपत्ति निर्माण करण्यास मोकळीक मिळेल व त्यांचे प्रयत्नांनीं जगांतील जीवनमान समृद्ध होण्यास मदत होईल व त्यांचे स्पर्धेचें भय जुन्या राष्ट्रांस वाटणार नाहीं.

पृथ्वीवर शांतता टिकवावयाची असेल तर आंतरराष्ट्रीय सहकार्य लागेल, या बाबतींत सर्वांचेंच एकमत आहे. वरील पद्धतीची व्यवहार पद्धत निर्माण झाल्यास अत्यंत आवश्यक अशा बाबतींत सहकार्य घडून आलें असें ठरेल. निर्धन राष्ट्रास खरीखुरी मदत करावयाची इच्छा जर एखाद्या श्रीमंत राष्ट्रास झाली, तर तशी संधि अशा प्रकारच्या व्यवहारानेंच मिळेल. पश्चिम आणि पूर्व युरोप यांतील विग्रह मिटवून टाकण्यास ही पद्धत उपयोगी पडेल.

हें जसें युरोपचे बाबतींत व इंग्लंड आदि नव्यानें दरिद्री बनलेल्या राष्ट्रांबद्दल खरें, तद्वतच हिंदुस्थानचे बाबतींतहि खरेंच ठरेल. जें राष्ट्र संपत्ति निर्माण करण्याकरतां भगीरथ प्रयत्न करीत नाहीं त्या राष्ट्रास या पद्धतीप्रमाणें व्यवहार करूनहि कांहीं फायदा व्हावयाचा नाहीं हें लक्षांत ठेवावें. नुसताच निर्यातीचा व्यापार करणाऱ्या राष्ट्रास लवकरच आढळून येईल, कीं स्वराष्ट्राकडे परत येणाऱ्या संपत्तीपेक्षां अधिक किंमतीचा माल परराष्ट्रांत पाठविण्यामुळें स्वतःच्या राष्ट्रास आपण गरीब करीत आहोत. उत्पादनांत आळशी अगर गैरवाकबगार असलेलें राष्ट्र जर आयात केल्या जाणाऱ्या मालाच्या किंमतीपेक्षा कमी किंमतीची निर्मिति करूं लागलें तर अशा राष्ट्रास कोण किती कायमची आपली मदत देत राहील? 'आपलेवरील कर्ज फेडून टाकण्यास उत्तेजनच मिळत रहावें असा वरील व्यवहारव्यवस्थेचा उद्देश आहे व त्यामुळें "न फेडलें जाणारें ऋण" ही चीज यापुढें जगांत राहूं नये हें सिद्धीस जाण्यासारखें आहे.

ही विचारप्रणाली जर सर्व मातबर राष्ट्रांस न पटली तर ? भवितव्याचा विचार करणें फार गंभीर ठरेल !

## सार्वजनिक योजनांवर घसारा काढला पाहिजे

रा. ब. न. स. जोशी, बी. ई. (सिव्हिल) एम्. आय. ई. (इंडिया), एम्. आर. सॅन. आय. (लंडन), सेवानिवृत्त सुपरिंटेंडिंग एंजिनिअर, ह्यांचें पत्र.

रा. रा. संपादक "अर्थ" यांस सा. न. वि. वि.

बुधवार ता. ८-४-५३ च्या अंकांत आपण "घसारा" काढण्याची योग्य पद्धति व तिची जरूरी यासंबंधीं अग्रलेख लिहिला, त्यांतील विचार मननीय आहेत. माझ्या माहितीप्रमाणें आपण सुचवितां त्या रीतीनें म्हणजे जुन्या ऐवजीं नव्या व सुधारलेल्या यंत्रांची खरेदी करण्यास पुरे इतका "घसारा" बहुतेक सर्व व्यापारी कंपन्या काढून ठेवतात. अर्थात्, त्यास अपवाद असतील.

खरी तक्रार आपण म्हणतां त्याच्या उलट आहे. मुरब्बी व्यापारी (Businessmen) व औद्योगिक (Industrial) कंपन्या घसारा काढून ठेवतात तो आंकडा डोळ्यांत सलण्याइतका मोठा असतो. यंत्राच्या मूळ किंमतीच्या ५० टक्के घसारा सालोसाल काढून ठेवणाऱ्या कंपन्यांचीं नांवें सांगतां येतील. तसें करण्यांतला हेतु कळण्यास मार्ग नाहीं. परंतु नफा कमी दाखवून प्राप्ति कमी दाखवावी व तीवरील कराहि कमी देतां यावा असा उद्देश असतो म्हणतात.

५० टक्के घसारा काढून ठेवून सुद्धां अशा कंपन्या २५ टक्के फायदा मिळवितात. हा एक प्रकार, तर त्याच्याबरोबर उलट प्रकार सरकारी पैशावर चाललेल्या योजनांचा. अशा योजनांवर घसारा काढण्याची भाषाच अशक्य. कारण खर्चवेंच वजा जातां राहिलेल्या बाकींतून मूळ रकमेवरील ३ टक्के व्याज सुद्धां भागत नाहीं. कांहीं धरणें गाळानें किती झपाट्यानें भरतात याची कल्पना फारच थोड्यांना असेल.

साताऱ्यांतील मायणी धरण ४० वर्षांत गाळानें पूर्ण भरलें. शिरसुफळ, म्हसवड, एकरूक वगैरे इतरहि अनेक उदाहरणें आहेत. धरणें गाळानें भरल्यामुळें धरण बांधण्यास लागलेलें मूळ भांडवल व त्यावरील सांठलेले (मूळ भांडवला इतकेंच) व्याज यांचा बोजा राज्यांतील ३ कोटी जनतेस सोसावा लागणार; कारण घसारा काढून ठेवण्याइतकी वर्षअखेर शिल्लकच नसते.

पूर्वींचें सरकार परकी असल्यामुळें सरकारी योजनेकडे परकेपणानें बघण्याची दृष्टि आपण आजवर ठेवली; पण आतां तरी सार्वजनिक (राष्ट्रीक वा राजिक) योजनांवर "घसारा" आकारण्याची व्यवस्था झाली पाहिजे हें उघड आहे. सार्वजनिक पायनिक कालव्यावर ३ टक्के व्याजहि सुटूं नये व वर्षानुवर्षे २५ टक्के नफा मिळविणाऱ्या व्यापारी कंपन्यांनीं यंत्राच्या मूळ किंमतीच्या ५० टक्के पर्यंत घसारा सालोसाल आकारावा ही विसंगत प्रथा घातुक आहे.

बापानें मुलास लहानपणीं कडेवर घ्यावें व पुढें बोटाला धरून चालण्यास शिकवावें हें योग्य. मात्र मुलगा वयांत आल्यावर व मिळविता झाल्यावर उलट त्यानें वृद्ध पित्यास आधार द्यावयाचा असतो. तसें करण्याऐवजीं वृद्ध पित्यास शिळी भाकरी (३ टक्के व्याज) सुद्धां नाहीं व गलेलठ्ठ मुलास रसगुल्ले (५० टक्के घसारा) चारण्याचा आग्रह करावा' असा आपल्या अग्रलेखाचा उद्देश खासच नसणार. "घसारा" आकारणें तो सर्वांनींच (खाजगी वा सरकारी) असाच आपला उद्देश, हें उघड आहे.

१२८७, शिवाजीनगर
पुणें ५
दि. १८।४।१९५३

आपला,
नरहर सदाशिव जोशी

हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गानिवास', ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.